# मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे) कार्यपध्दती.

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे) नियम १९६६ च्या तरतुदीनुसार सदस्यसंख्या निश्चिती , प्रभाग रचना व जागांचे आरक्षण करतांना अंमलात आणावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील :-**

**(१) पंचायतींमध्ये निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्याः-** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम कलम १० च्या पोटकलम (१) मधील खंड (अ)नुसार व मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे ) नियम, १९६६, मधील नियम २ अ च्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक पंचायतीत प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पंचायत क्षेत्रातील निकटपूर्वीच्या जनगणनेच्या प्रसिध्द झालेल्या आकडेवारीनुसार निश्चित केलेल्या लोकसंख्येच्या आधारे ठरवण्यात येईल. **याबाबत ग्रामपंचायतीचे क्षेत्र निश्चित करताना जे क्षेत्र (भूमापन क्रमांक, गट क्रमांक इ.) ज्या गावात समाविष्ठ असेल त्या गावाच्या ग्रामपंचायतीत सदर क्षेत्र समाविष्ठ असल्याचे समजण्यात येईल.**

**तक्ता**

| अ.क्र. | लोकसंख्या | निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | १,५०० किंवा १,५०० पेक्षा कमी | ७ |
| २ | १,५०१ ते ३,००० | ९ |
| ३ | ३,००१ ते ४,५०० | ११ |
| ४ | ४,५०१ ते ६,००० | १३ |
| ५ | ६,००१ ते ७,५०० | १५ |
| ६ | ७,५०१ आणि अधिक | १७ |

**(२) गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि प्रत्येक प्रभागांतून निवडावयाच्या सदस्यांची संख्याः-** कलम १० च्या पोट कलम (१) मधील उपबंधास व मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६, च्या नियम ३ च्या तरतुदीस अधीन राहून, गावाचे प्रभागात विभाजन करण्यात येईल व प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांची संख्या खाली दर्शविलेल्या तत्त्वानुसार निश्चित केली जाईल.

प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांची संख्या व त्या प्रभागाची लोकसंख्या यामधील प्रमाण, शक्य असेल तेथवर, गावातील सर्व प्रभागांमध्ये एक सारखे राहील अशा रीतीने गावाचे योग्य त्या संख्येत प्रभाग पाडून गावाची विभागणी करण्यात येईलः

अधिनियम १० (१) ब च्या ३ च्या परंतुकाच्या तरतुदीप्रमाणे

पंचायतीची एकूण लोकसंख्या = क्ष

एकूण सदस्य संख्या

तर प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या = क्ष x त्या प्रभागात निवडावयाची सदस्य संख्या

त्याप्रमाणे गावाची भौगोलिक परिस्थिती विचारात घेतली जाईल आणि क्षेत्राची भौगोलिक सलगता शक्य असेल तेथवर ठेवण्यात येईल.

प्रभागांना दक्षिण दिशेकडून सुरुवात करुन दक्षिण-पश्चिम, पश्चिम, पश्चिम-उत्तर, उत्तर, उत्तर-पूर्व, पूर्व व दक्षिण-पूर्व या क्रमाने क्रमांक दिले जातील

परंतु, एकाच दिशेस एकाहून अधिक प्रभाग पडत असतील तर त्या दिशेस गावाच्या सीमा रेषेजवळ असलेल्या प्रभागांस पहिला क्रमांक देऊन त्याच्या लगतच्या प्रभागास दुसरा व पुढे असे क्रमांक देण्यात येतील

**प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांची संख्या तीनपेक्षा जास्त व दोनपेक्षा कमी असणार नाही**

(३) **अनुसूचित जाती व अनु. जमाती यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रीतः-** कलम १० च्या पोट-कलम (२) मधील खंड (अ) व (ब) तसेच मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे )नियम, १९६६ च्या नियम ४ च्या तरतुदींना अधीन राहून, अनु. जाती व अनु. जमाती यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्यात येतील .

परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायतीमध्ये, अनु. जमातींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा पंचायतीमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांशपेक्षा कमी असणार नाहीतः

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये असलेल्या पंचायतीमधील अनुसूचित जमातींसाठी असणारे आरक्षण खंड (ब) च्या तरतुदींनुसार असेल

याबाबतची कार्यपध्दती व सुत्र या परिपत्रकाच्या / आदेशाच्या सोबतच्या प्रपत्रात विहित केल्या आहेत.

स्पष्टीकरणः- जागांची संख्येची गणना करताना जागेचा एक द्वितीयांश किंवा त्यातून अधिक भाग हा एक भाग म्हणून मोजण्यात येईल आणि एक द्वितीयांशापेक्षा कमी भागाकडे दुर्लक्ष केले जाईल.

**(४) नागरिकांच्या मागास प्रवर्गातील व्यक्तींकरीता राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रीत,--**

कलम १०, पोटकलम(२) च्या खंड (क) च्या तसेच मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे)नियम, १९६६ च्या नियम ४अ च्या तरतुदींना अधीन राहून नागरिकांच्या मागास प्रवर्गातील व्यक्तींकरीता राखून ठेवावयाच्या जागा नेमून देण्यात येतील.

नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाती व्यक्तीसाठी राखून ठेवावयाच्या जागा पंचायतीमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांइतक्या असतील आणि अशा ज्या पंचायतीमधील वेगवेगळया प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील.

परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायतीमध्ये नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा अनु. जमाती आणि जाती यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर राहिलेल्या, कोणत्याही असल्यास, जागांच्या २७ टक्के इतक्या असतील.

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनु. क्षेत्रांमध्ये असलेल्या पंचायतीमधील नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण नियम १० (२) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार असेल.

परंतु आणखी असे की, चिठ्ठया काढण्याच्या वेळी, अनु. जातींसाठी व अनु. जमातींसाठी आधीच राखून ठेवलेल्या जागा वगळण्यात येतील.

यथास्थिती, अनु. जातींकरीता किंवा अनु. जमातींकरीता जागा नेमून दिल्यानंतर, उरलेल्या जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवणे आवश्यक असलेल्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असतील तर, त्या उपलब्ध असलेल्या जागा प्रभागांत अशा प्रवर्गाला अशाप्रकारे नेमून देण्यात येतील की प्रत्येक प्रभागामध्ये व्यवहार्य असेल तेथवर, किमान एक जागा, बिनराखीव राहील.

स्पष्टीकरणः- जागांच्या संख्येची गणना करताना जागेच्या एक द्वितीयांश किंवा त्यापेक्षा अधिक असलेला भाग एक भाग म्हणून मोजण्यात येईल किंवा एक द्वितीयांशापेक्षा कमी असलेल्या भागाकडे दुर्लक्ष करण्यात येईल.

**(५) स्त्रियांकरीता राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रितः-** कलम १० च्या पोट-कलम (२) मधील खंड(ड) मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ च्या नियम ४ ब च्या तरतुदींना अधीन राहून, स्त्रियांकरीता राखून ठेवावयाच्या जागा पुढील तत्त्वांनुसार नेमून देण्यात येतील.

अनु. जाती, अनु. जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांसाठी ज्या वेगवेगळया प्रभागांमध्ये जागा राखून ठेवण्यात आल्या असतील त्या प्रभागांना अशा राखून ठेवलेल्या जागांमधून या आदेशाच्या सोबतच्या प्रपत्रातील कार्यपध्दतीनुसार व अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार चिठ्ठया काढून अशा जातींमधील, जमातींमधील किंवा प्रवर्गामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा नेमून देण्यात येतीलः

(अ) मात्र नियम ४-ब (३) व (४) मधील तरतुदी या संविधानातील स्त्रियांसाठी आरक्षणाच्या तरतुदींशी विसंगत असल्याने जर संबंधित ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता एकच जागा राखून ठेवली असेल तर ती जागा प्रत्येक निवडणूकीत स्त्रियांसाठी राखून ठेवणे आवश्यक राहिल.

(ब) तसेच ज्या ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी दोन जागा राखून ठेवलेल्या असतील तर त्या दोन जागांपैकी एक जागेचे आरक्षण स्त्रीसाठी प्रत्येक निवडणूकीत देणे आवश्यक आहे. त्याकरिता पहिल्या निवडणूकीत सोडत पध्दतीने स्त्रियांसाठी आरक्षण ठरविण्यात यावे. मात्र दुसऱ्या निवडणूकीत दुसऱ्या जागेचे आरक्षण आळीपाळीने स्त्रियांसाठी नेमून देण्यात यावे.

याबाबतची सुत्र व कार्यपध्दती या परिपत्रकाच्या / आदेशाच्या सोबतच्या प्रपत्रात विहित केल्याप्रमाणे असेल. घटनेतील तरतुदीच्या अनुषंगाने विविध राखीव प्रवर्गामध्ये स्त्रीयांसाठी जागा आरक्षित केल्यामुळे स्त्रीयांसाठी करण्यात येणारे एकूण आरक्षण हे एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**त्याचप्रमाणे अनुसूचित जाती जमाती, नागरीकांच्या मागासप्रवर्गातील तसेच एकूण सदस्यांपैकी स्त्री राखीव जागांची गणना करतांना अपूर्णांक आल्यास पुढील पूर्णांक गणण्यात यावा. (उदा. एकूण सदस्य संख्या ७ असल्यास ७ चे एक तृतीयांश ७/३ =२.३३ येत असल्याने ३ जागा स्त्रियांसाठी राखीव राहतील.)**

**(६) अराखीव सदस्य संख्या निश्चित करण्याची रीत :-** एकूण सदस्य संख्येपैकी वर उल्लेख केल्याप्रमाणे यथास्थिती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागासप्रवर्ग व स्त्रियांकरीता राखीव जागा वगळता उर्वरित सदस्य अराखीव असतील याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम १० व मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ च्या नियम ४ अअ मधील तरतुदीनुसार जर जागा अनु. जाती किंवा जमाती किंवा यथास्थिती नागरिकांच्या मागास वर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमाती यासह) याकरीता राखीव असेल आणि अशा जाती आणि जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग यामधून उमेदवार उपलब्ध नसेल तर अधिनियमाच्या कलम १० अन्वये ज्या प्रवर्गासाठी जागा आरक्षित ठेवता येते. त्यापैकी कोणत्याही एका प्रवर्गासाठी अशी जागा तेवढयाच पदावधीसाठी सोडत पध्दतीने नेमून देण्यात येईलः

परंतु ज्यावेळी जागा अनु. जाती जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग मधील महिलांसाठी आरक्षित असेल व उक्त जाती जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमाती यासह) यामधील महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास जागा तेवढया मुदतीपुरती

(१) जर मूलतः अनु. जातींच्या महिलांसाठी असेल तर अनु. जातीसाठी

(२) जर मूलतः अनु. जमातींच्या महिलांसाठी असेल तर अनु. जमातीसाठी

(२) जर मूलतः नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी असेल तर : नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित असल्याचे समजण्यात येईल.

**राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि २००५/प्र.क्र.२३/का.८,**
**दि.    /६/०५ सोबतचे प्रपत्र**
**------------------------------जिल्हयातील ------------------------तालुक्यामधील -----**
**-ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचना व आरक्षणाबाबत विवरण.**

---

**(१) ग्रामपंचायतींची एकूण लोकसंख्या.**

(२) **अनुसूचित क्षेत्रात संपुर्ण /अंशतः समाविष्ट आहे किंवा नाही** सपुर्ण / अंशता:/ समाविष्ट नाही

**(३) मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदाचे आरक्षण) नियम १९६६ मधील नियम २-अ नुसार एकूण सदस्य संख्या.**

**(४) एकूण प्रभागांची संख्या**

(५) **प्रत्येक सदस्याच्या पदाकरिता सरासरी लोकसंख्या** क्ष = पंचायतीची एकूण लोकसंख्या / एकूण सदस्य संख्या

**(६) प्रभागाची लोकसंख्या**

| प्रभाग क्रमांक | सदस्य संख्या | प्रभागाची प्रमाण लोकसंख्या = (क्ष x सदस्य संख्या) | प्रभागाची जनगणणेनुसार लोकसंख्या | वाढ किंवा घट % ( ४-३ ) x १०० / ३ | हि टक्केवारी ± १० % पेक्षा अधिक नसावी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**(७) अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या.**

(अ) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १० मधील पोटकलम (२) मधील खंड (ब) तसेच मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम-४ नुसार अनुसूचित जातींसाठी जागांची आरक्षित संख्या.
(सूत्र = अनुसूचित जातींची लोकसंख्या X एकूण सदस्य संख्या )
__एकूण लोकसंख्या

**( जागांच्या संख्येची गणना करताना जागेचा एक द्वितियांश किंवा त्याहून अधिक भाग हा एक भाग म्हणून गणला जाईल आणि एक द्वितियांशापेक्षा कमी भागाकडे दुर्लक्ष केले जाईल.)**

**(टीपः-अनुसूचित जाती व जमातीसाठी राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रित मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदाचे आरक्षण) नियम १९६६ च्या नियम ४ मधील तरतुदीनुसार असेल)**

**(८) अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या**

(अ) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १०
मधील पोटकलम (२) मधील खंड (ब) तसेच मुंबई
ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि
जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम-४ नुसार
अनुसूचित जमातींसाठी जागांची आरक्षित संख्या.

(सूत्र = अनुसूचित जमातींची लोकसंख्या X एकूण सदस्य संख्या )
एकूण लोकसंख्या

( जागांच्या संख्येची गणना करताना जागेचा एक द्वितियांश किंवा त्याहून अधिक भाग हा एक भाग म्हणून गणला जाईल आणि एक द्वितियांशापेक्षा कमी भागाकडे दुर्लक्ष केले जाईल.)

**(टीपः- १. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम १० चे १ (ब) मधील परंतुकाचे तरतुदीनुसार संपूर्णतः क्षेत्र अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या पंचायतीमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या जागा पंचायतीमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश पेक्षा कमी असणार नाहीत तसेच जर संबंधित ग्रामपंचायतीचे काही क्षेत्र अंशतः अनुसूचित क्षेत्रात असेलतर अनुसूचित जमातीसाठी आरक्षण वरीलप्रमाणेच असेल)**

(टीपः- २. अनुसूचित जाती व जमातीसाठी राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रित मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण) नियम, १९६६ च्या नियम ४ मधील तरतुदीनुसार असेल)

(९) **नागरिकांच्या मागास प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित सदस्य संख्या.**

(अ) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १०
मधील पोटनियम (२) मधील खंड (क) तसेच मुंबई
ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि
जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम ४-अ (१) नुसार
आरक्षित सदस्य संख्या.

(सूत्र = अनुक्रमांक (३) मधील एकूण सदस्य संख्या X २७ )
१००

( जागांच्या संख्येची गणना करताना जागेचा एक द्वितियांश किंवा त्याहून अधिक भाग हा एक भाग म्हणून गणला जाईल आणि एक द्वितियांशापेक्षा कमी भागाकडे दुर्लक्ष केले जाईल.)

(ब) मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम ४-अ मधील पोटनियम (२) नुसार आरक्षित सदस्य संख्या.

**(टीपः- नागरिकांच्या मागासवर्गाकरीता राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रित मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदाचे आरक्षण) नियम १९६६ मधील नियम ४-अ मधील तरतुदीनुसार असेल)**

**(१०) स्त्रियांसाठी आरक्षित सदस्य संख्या**

(अ) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १० मधील पोटकलम (२) मधील खंड (ड) नुसार एकूण स्त्री आरक्षित सदस्य संख्या.

(सूत्र = एकूण सदस्य संख्या / ३ )

(जागांच्या संख्येची गणना करताना अपुर्णांक आल्यास पुढील पुर्णांक गणण्यात यावा. )
(उदा. २.३३=३)

(ब) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १० मधील पोटकलम (२) मधील खंड (ब) परंतुक व खंड (ड)नुसार अनुसूचित जातींच्या स्त्री राखीव जागांचे आरक्षण.

(सूत्र = अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या / ३ )

(जागांच्या संख्येची गणना करताना अपुर्णांक आल्यास पुढील पुर्णांक गणण्यात यावा. )
(उदा. २.३३=३)

(क) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १० मधील पोटकलम (२) मधील खंड (ब) परंतुक व खंड (ड)नुसार अनुसूचित जमातींच्या स्त्री राखीव जागांचे आरक्षण.

(सूत्र = अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या / ३ )

(जागांच्या संख्येची गणना करताना अपुर्णांक आल्यास पुढील पुर्णांक गणण्यात यावा. )
(उदा. २.३३=३)

(ड) मुंबई ग्रामपंचायती अधिनियम १९५८ चे कलम १० मधील पोटकलम (२) मधील खंड (क) परंतुक व खंड (ड)नुसार नागरिकांच्या मागास प्रवर्गातील स्त्री राखीव जागांचे आरक्षण.

(सूत्र = नागरिकांच्या मागास प्रवर्गातील जमातींची आरक्षित सदस्य संख्या )
३

(जागांच्या संख्येची गणना करताना अपुर्णांक आल्यास पुढील पुर्णांक गणण्यात यावा. )
(उदा. २.३३=३)

(ई) उरलेल्या सर्वसाधारण स्त्री आरक्षित सदस्य संख्या.
(अनुक्रम १०अ- (अनुक्रम १०ब+१० +१०ड)]

**(टिपः- स्त्रियांकरीता राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आळीपाळीने देण्याची रित :- मुंबई ग्रामपंचायत सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण इत्यादीबाबत)नियम, १९६६ च्या नियम ४(ब) मधील तरतुदीनुसार असेल**

**(अ) मात्र नियम ४-ब (३) व (४) मधील तरतुदी या संविधानातील स्त्रियांसाठी आरक्षणाच्या तरतुदींशी विसंगत असल्याने जर संबंधित ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता एकच जागा राखून ठेवली असेल तर ती जागा प्रत्येक निवडणूकीत स्त्रियांसाठी राखून ठेवणे आवश्यक राहिल.**

**(ब) तसेच ज्या ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी दोन जागा राखून ठेवलेल्याअसतील तर त्या दोन जागांपैकी एक जागेचे आरक्षण स्त्रीसाठी प्रत्येक निवडणूकीत देणे आवश्यक आहे. त्याकरिता पहिल्या निवडणूकीत सोडत पध्दतीने स्त्रियांसाठी आरक्षण ठरविण्यात यावे. मात्र दुसऱ्या निवडणूकीत दुसऱ्या जागेचे आरक्षण आळीपाळीने स्त्रियांसाठी नेमून देण्यात यावे.**

**(७) सर्वसाधारण (अराखिव) सदस्य संख्या [ अनुक्रमांक ३-(७+८+९+१०)]**

## सोडत पध्दतीबाबत सूचनाः-

आरक्षणाबाबत व आरक्षित जागेच्या वाटपाबाबत चिठ्ठया टाकून सोडत पध्दतीने कार्यवाही करावी. याकरीता राज्य निवडणूक आयोगाने ठरवून दिलेला सोडतीचा दिवस व वेळ याबाबत संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व गावांत चावडीवर व ठळक ठिकाणी सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात. तसेच सूचनेबद्दल दवंडीने घोषणेची व्यवस्था करावी.

१) प्रभाग रचनेबाबत व सदस्य संख्येबाबत सर्वांना सर्वसाधारण माहिती द्यावी.

२) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाबाबत व स्त्रियांचे आरक्षणाबाबत सर्वांना सर्वसाधारण माहिती द्यावी.

३) सोडत कार्यपध्दतीबाबत उपस्थितांना सर्वसाधारण माहिती द्यावी.

४) ड्रम किंवा सोईस्कर उपकरणात चिठ्ठया लिहून टाकाव्यात. उपस्थितांपैकी लहान मुलाच्या हाताने सर्व उपस्थित प्रतिनिधी यांच्या समक्ष काढण्यात यावी. याबाबत सोबत सोडत पध्दतीसाठी सभेच्या इतिवृत्ताचा नमुना जोडला आहे.

**प्रारुप प्रभाग रचना व जागांचे आरक्षणाबाबत**

(अ) वरील परिच्छेद मधील दिलेल्या सूचनेनुसार पंचायतीची तयार केलेली प्रभाग रचना व प्रत्येक पभागातून निवडावयाच्या सदस्याच्या आरक्षणाबाबतचा तपशील राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ठरवून दिलेल्या दिवशी मुंबई ग्रामपंचायत
च्या कलम ५(२) मधील तरतुदीनुसार नमुना ब प्रमाणे गावातील चावडी व ठळक ठिकाणी तसेच प्राधिकृत अधिक-याच्या कार्यालयात सूचना फलकावर अधिसूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात यावे.

(ब) राज्य निवडणूक आयोगाने विहीत केलेल्या मुदतीत संबंधितांकडून प्राप्त झालेले आक्षेप प्राधिकृत अधिका-यांसमोर सविस्तर माहिती व अभिप्रायासह सादर करण्यात यावे व प्राधिकृत अधिकारी यांनी या संदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचना इ. देणा-या सर्व संबंधित व्यक्ती यांना प्रत्यक्ष सुनावणी द्यावी व सुनावणी दिल्यानंतर प्राधिक.त अधिकारी यांनी लेखी आक्षेपांच्या संदर्भात कारणमिमांसा देऊन लेखी स्वरुपाचे आदेश पारित करावेत.

वरीलप्रमाणे आदेश पारित केल्यानंतर जर प्रभाग रचनेत फेरबदल होत असेल तर व अशा फेरबदलामुळे आरक्षणात देखील बदल आवश्यक असेल तर आरक्षणासंबंधी योग्य ते बदल करुन वरील दिलेल्या सूचनेप्रमाणे पुन्हा सोडत काढण्यात यावी व अशारितीने प्रभाग रचना व जागांचे आरक्षण इ. अंतिम करण्यात यावे.

ग्रामपंचायत कलम ५(१) अन्वये विहीत केलेली नमुना (अ) मधील अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाने ठरविलेल्या दिवशी गावातील चावडी व ठळक ठिकाणी तसेच प्राधिकृत अधिका-याच्या कार्यालयात सूचना फलकावर अधिसूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात यावे.

(१०) वरील दिलेल्या सर्व सूचनांबाबत प्राधिक.त अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिका-यांव्दारे काटेकोरपणे पालन केले जाईल याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील तसेच राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचनेसंबंधी दिलेल्या निवडणुकीच्या कार्यक्रमात ठरविलेल्या दिनांका अन्वये होणा-या प्रत्येक कार्यवाहीसंबंधी अहवाल वेळेवर फॅक्सव्दारे व टपालामार्फत राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास कळविणे आवश्यक राहील. या सूचनेसंबंधी कोणतीही शंका व स्पष्टीकरण आवश्यक असेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगशी संपर्क साधावा. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय व अंतिम व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

राज्य निवडणूक आयुक्तांचे आदेशानुसार,

## सभेचे इतिवृत्त

आज दिनांक ------- २००५ रोजी सकाळी/दुपारी -- ----- वाजता ग्रामपंचायत कार्यालयात/ चावडीमध्ये ग्रामपंचायत------------ तालुका ----------- च्या निवडणूकीसाठी मुंबई ग्रामपंचायत निवडणूक सुधारणा अधिनियम, १९९४ नुसार सदरील ग्रामपंचायतीचे प्रभागनिहाय जागा लॉट पध्दतीने (चिठ्ठया टाकून) निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ.क्र. | प्रतिनिधीचे नांव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| २. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ३. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ४. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ५. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ६. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ७. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ८. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| ९. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |
| १०. | ---------------------------------- | --------------------- | --------------------- |

प्रथम उपस्थित सर्व प्रतिनिधी/ नागरिक यांना ग्रामपंचायत -------------चे निवडणूकीसंबंधी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सविस्तर माहिती देण्यात आली.

(१) ग्रामपंचायतीचे नाव .. ----------------------------
----

(२) सन २००१ चे जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ..

(३) एकूण प्रभागाची संख्या ..

(४) उक्त नमूद लोकसंख्येनुसार निवडून द्यावयाचे संख्या .. पुरुष स्त्री राखीव १/३

एकूण सदस्य संख्या

(५) अनुसूचित जातीसाठी एकूण राखीव जागेची संख्या ..

(६) अनुसूचित जमातीसाठी एकूण राखीव जागेची संख्या ..

(११) नागरिकांचा मागासवर्गासाठी एकूण राखीव जागेची संख्या ..

(१२) उरलेल्या सर्वसाधारण जागेची एकूण संख्या ..

(अ.क्र. ५+६+७+८) = अ.क्र.४ इतकी सदस्य संख्या

त्याचप्रमाणे उक्त नमूद मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार-

(अ) मात्र नियम ४-ब (३) व (४) मधील तरतुद संविधानातील स्त्रियांसाठी आरक्षण तरतुदीसाठी

विसंगत असल्याने जर संबंधित ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता एकच जागा राखून ठेवली असेल तर ती जागा प्रत्येक निवडणूकीत स्त्रियांसाठी राखून ठेवणे आवश्यक राहिल.

(ब) तसेच ज्या ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी

दोन जागा राखून ठेवलेल्या असतील तर त्या दोन जागांपैकी एक जागेचे आरक्षण स्त्रीसाठी प्रत्येक

**निवडणूकीत देणे आवश्यक आहे. त्याकरिता पहिल्या निवडणूकीत सोडत पध्दतीने स्त्रियांसाठी आरक्षण ठरविण्यात यावे. मात्र दुसऱ्या निवडणूकीत दुसऱ्या जागेचे आरक्षण आळीपाळीने स्त्रियांसाठी नेमून देण्यात यावे.**

याप्रमाणे तरतूद असल्याने सदर गावातील एक लहान मुलगा चि.------------------- वय ------ याची चिठ्ठी काढण्यासाठी सर्वानुमते निवड करण्यात आली.

वरीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरल्यानंतर जागेच्या तपशिलाची माहिती देण्यात आली आणि नागरिकांचा मागासवर्ग राखीव व सर्व वर्ग प्रवर्गातील स्त्री राखीव जागा, प्रभागनिहाय निश्चित करण्यासाठी उपरोक्त नमूद केलेल्या लहान मुलाच्या हाताने उपस्थित सर्व नागरिक/ प्रतिनिधी यांचे समक्ष चिठ्ठया काढण्यात आल्या. चिठ्ठयानुसार (लॉट पध्दतीने) खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जागा निश्चित करण्यात आल्या.

| **अ.क्र.** | **राखीव जागेचा प्रकार** | **लॉटसाठी दिलेले प्रभाग क्रमांक** | **लॉटनुसार आलेला प्रभाग क्रमांक** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | अनुसूचित जातीच्या राखीव जागांमधून अनुसूचित जाती स्त्री राखीव जागा | | | |
| २ | अनुसूचित जमातीच्या राखीव जागांमधून अनुसूचित जमाती स्त्री राखीव जागा | | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग राखीव जागा एकूण जागेच्या २७ टक्के प्रमाणे (चिठ्ठया टाकताना अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या सर्व जागा पुरुष व स्त्रियांसाठीच्या एकूण जागा वगळून राहिलेल्या जागांसाठी चिठ्ठया टाकाव्यात.) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | नागरिकांचा मागासवर्ग अ.क्र.३ येथे नमूद केलेल्या जागांमधून स्त्री राखीव जागा | | | |
| ५ | उर्वरित जागांमधून सर्वसाधारण स्त्री राखीव जागा | | | |

वरीलप्रमाणे चिठ्ठया टाकण्याची कार्यपध्दती सर्व उपस्थित नागरिक/प्रतिनिधी यांचे समक्ष पूर्ण करण्यात आली. लॉट पध्दतीनुसार निश्चित केलेल्या प्रभागनिहाय जागेबाबत त्यांची काहीही तक्रार आहे किंवा कसे हे विचारण्यात आले. संबंधितांना प्रभागनिहाय बिनराखीव जागांचा तपशिल देण्यात येऊन वरीलप्रमाणे कामकाज पूर्ण करण्यात येऊन उपस्थित सदस्य/ नागरिकांचे /प्रतिनिधीचे आभार मानून विषयांकीत सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

तहसिलदार/
तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेला
अधिकारी

**(नमुना अ**

**(नियम ५(१) पहा)**

**अधिसूचना**

क्रमांक- मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागांत विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ याच्या नियम ५(१) अनुसार मी-- राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,-

(अ) ------ ग्रामपंचायतीत -------सदस्यांचा समावेश राहील

(ब)-------- गावाचे ------ प्रभागांमध्ये विभाजन करण्यात येईल

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली सदस्याची संख्या ही, स्तंभ (१) मध्ये अशा संख्येसमोर विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील

(ड) अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रभाग हे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३), (४), (५) व (६) यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे अनु. जाती, अनु. जमाती, नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग व स्त्रिया यांच्यासाठी ज्या प्रभागांतून जागा राखून ठेवण्यात येतील, असे प्रभाग असतील.)

अनुसूची

| प्रभागांची संख्या व विस्तार | निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या | अनु. जाती साठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | अनु. जमाती साठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | ना.मा.प्र. करीता राखून ठेवलेल्या जागांची संख्या | स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनु. जाती साठी (अ) | अनु. जमाती साठी (ब) | ना.मा. प्र.तील ा (क) | सर्व साधारण (ड) | एकूण (अ+ब+क+ड) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | | | | |
| | | | | | | | | | |

राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी

**(नमुना ब**

**(नियम ५(२) पहा)**

मी, ------, राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ याच्या नियम ५(२) अनुसार काढल्याचे योजलेल्या अधिसूचनेचा पुढील मसुदा तिच्यामुळे बाधीत होणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे व याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा ------ नंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त अधिसूचनेच्या मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून------ पूर्वी कोणतेही आक्षेप किंवा सूचना माझ्याकडे आल्यास मी त्या विचारात घेईन.

अधिसूचना

क्रमांक- मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागांत विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ याच्या नियम ५(२) अनुसार मी-- राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,-

(अ) ------ या ग्रामपंचायतीत -------सदस्यांचा समावेश राहील

(ब)-------- गावाचे ------ प्रभागांत विभाजन करण्यात येईल

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली सदस्याची संख्या ही, स्तंभ (१) मध्ये अशा संख्येसमोर विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील

(ड) अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रभाग हे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३), (४), (५) व (६) यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे अनु. जाती, अनु. जमाती, नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग व स्त्रिया यांच्यासाठी ज्या प्रभागांतून जागा राखून ठेवण्यात येतील, असे प्रभाग असतील.)

अनुसूची

| प्रभागांची संख्या व विस्तार | निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या | अनु. जाती साठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | अनु. जमाती साठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | ना.मा.प्र. करीता राखून ठेवलेल्या जागांची संख्या | स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनु. जाती साठी | अनु. जमाती साठी | ना.मा.प्र.तील | सर्व साधारण | एकूण (अ+ब+क+ड) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | | | |
| | | | | | | | | | |

राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी